# <u>प्रेस नोट</u>

दिनांक- ३०/०३/२०२४

**कक्ष-७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबई च्या पथकाने आरोपीकडून एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ विकून आलेली रोख रक्कम रूपये ३,४६,६८,२००/-हस्तगत केलेबाबत.....**

| | |
|---|---|
| कक्ष | कक्ष-७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबई. |
| गु.र.क्र. व कलम | गु.प्र.शा., वि.स्था.गु.र.क्र. १२/२०२४, कलम ८ (क), २२ (क), २९ अंमली पदार्थ विरोधी कायदा (कुर्ला पोलीस ठाणेस, वि.स्था.गु. र.क्र. ६७/२०२४) |
| गुन्हा घडला, दिनांक व वेळ | दिनांक १६/०२/२०२४ रोजी ००.४० वा. च्या सुमारास |
| गुन्हा दाखल दिनांक | दिनांक १६/०२/२०२४ रोजी १४.५५ वा. |
| घटनास्थळ | सयाजी पगारे चाळच्या बाजुच्या फुटपाथवर, सि.एस.टी. रोड, चेंबुर-सांताक्रुझ लिंक रोड, कुर्ला (प), मुंबई. |
| अटक आरोपीतांची संख्या | एकुण १० (०९ पुरूष आरोपी व ०१ महिला आरोपी) |
| जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत | १) एकुण १२६ किलो ६४१.५ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ, किं.रू.२५२,२८,००,०००/-<br>२) रोख रक्कम रू. ०३,६२,५६,२००/-<br>३) २५.०७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे, अं.कि.रू. १,५०,४२०/-<br>४) सफेद रंगाची स्कोडा मोटार कार, अं.कि.रू. १०,००,०००/-<br>एकुण किंमत रू. २५६,०२,०६,६२०/-<br>(दोनशे छप्पन करोड दोन लाख सहा हजार सहाशे वीस रूपये.) |

**थोडक्यात हकिगत** - कक्ष-७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबईच्या पोलीस पथकास मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे दिनांक १६/०२/२०२४ रोजी सापळा रचुन एका महिला आरोपीस चेंबुर-सांताक्रुझ लिंकरोड, कुर्ला (प), मुंबई येथुन एकुण ६४१ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ तसेच अंमली पदार्थाचे व्यवसायामधुन मिळविलेली रोख रक्कम रू. १२.२० लाख रूपये व २५ ग्रॅम (कि.अं.रू. १,५०,४२०/-) सोन्याच्या दागिण्यांसह अटक करण्यात आली. सदरबाबत कुर्ला पोलीस ठाणे येथे वि.स्था.गु.र.क्र. ६७/२०२४, कलम ८(क), २२(क), २९ अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा नोंद करून सदरचा गुन्हा मा. वरिष्ठांवे आदेशान्वये पुढील तपासासाठी कक्ष-७ कार्यालयाकडे घेण्यात आला.

नमुद महिला आरोपीताकडे केलेल्या चौकशीत तीने सदरचा एम.डी. हा अंमली पदार्थ मिरा रोड येथील तीच्या ओळखीच्या इसमाकडुन आणला असल्याचे सांगितले. त्यावरुन कक्ष-७ चे पथकाने एका पुरूष आरोपीतास मीरा रोड येथुन ०३ कि.ग्रॅ. वजनाचा एम.डी. हा अंमली पदार्थ (अं.कि.रू. ६ कोटी) व रू. ३.६८ लाख रोख रक्कमेसह ताब्यात घेऊन सदर गुन्ह्यात अटक केली. त्याचेकडे केलेल्या चौकशीत त्याने सदरचा एम.डी. हा अंमली पदार्थ सुरत, गुजरात येथे राहणाऱ्या ०२ इसमांना दिल्याचे सांगितल्याने सदर इसमांना सुरत, गुजरात येथुन अटक करण्यात आली.

सदर गुन्ह्याचा तपास चालु असताना आरोपीतांकडे व साक्षीदारांकडे केलेल्या चौकशीवरून तसेच तांत्रिक तपासाव्दारे आणि पोलीस पथकाने वेगवेगळ्या ठिकाणी पाळत ठेवुन प्राप्त माहितीच्या आधारे दिनांक २५/०३/२०२४ रोजी सांगली जिल्ह्यातील कवठे महाकाल पोलीस ठाणे हद्दीत इरळी या गावात धडक कारवाई करून एम.डी. हा अंमली पदार्थ बनविणाऱ्या कारखान्याचा शोध घेऊन एकूण १२२.५०० कि.ग्रॅ. वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ (अं.कि.रू.२४५ कोटी) तसेच एम. डी. बनविण्यासाठी वापरण्यात येणारे साहीत्य व गुन्हयात वापरलेले वाहन ताब्यात घेतले. सदर कारवाईमध्ये एकुण ०६ पुरुष आरोपीतांना अटक करण्यात आली असुन त्यांना मा. न्यायालयाने सदर आरोपींना दिनांक ०३/०४/२०२४ रोजीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

**सदर गुन्हयातील मुख्य आरोपीताकडे केलेल्या अधिक तपासामध्ये आरोपीने अंमली पदार्थ विक्रीतुन कमावलेले ०३,४६,६८,२००/- रूपये भिवंडी, जि.ठाणे येथील घरात लपवून ठेवलेले हे दिनांक २९/०३/२०२४ रोजी जप्त करण्यात आले.**

**सदर तपासमध्ये अद्यापपर्यंत १२६ किलो ६४१.५ ग्रॅम एम.डी. (मॅफेड्रॉन) हा अंमली पदार्थ किंमत २५२,२८,००,०००/- रूपये, २५.०७ ग्रॅम सोन्याचे दागिने किंमत १,५०,४२०/- रूपये, गुन्हयात वापरलेली स्कोडा कंपनीची कार किंमत १०,००,०००/- रूपये तसेच रोख ०३,६२,५६,२००/- रूपये असा एकूण २५६,०२,०६,६२०/- रूपये (दोनशे छप्पन करोड दोन लाख सहा हजार सहाशे वीस रूपये) किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास चालु आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी मा.पोलीस आयुक्त, विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) लखमी गौतम, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) शशी कुमार मिना, मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) दत्ता नलावडे, मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१) विशाल ठाकूर, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-पूर्व) चंद्रकांत जाधव यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष-७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबई चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश तावडे, पो.नि. आत्माजी सावंत, म.पो.नि.राजश्री बाळगी, पो.नि.निरज उबाळे, म.पो.नि.स्वप्ना शहापुरकर, स.पो.नि. अमोल माळी (कक्ष-५), पो.उ.नि. रामदास कदम, पो.उ.नि.स्वप्निल काळे, पो. उ.नि.महेश शेलार, पो.उ.नि. नामदेव परबळकर, म.स.फौ. निधी धुमाळ, म.स.फौ.स्नेहा नाईक, स. फौ.अरूण सावंत, स.फौ.तानाजी उबाळे, पो.ह.क्र. ३१३४७/दिपक पवार, पो.ह.क्र. ३२८०७/संतोष गुरव, पो.ह.क्र.३४३४४/प्रदीप बडगुजर, पो.ह.क्र.९६०१८३/सुभाष मोरे, पो.ह.क्र. ९६०५५२/शशिकांत कांबळे, पो.ह.क्र.९६०६३३/अजय बल्लाळ, पो.ह.क्र.९७०६५१/गिरीष जोशी, पो.ह.क्र.९७०९४४/अस्लम शेख, पो.ह.क्र.००३५१/विनोद शिरापुरी, पो.ह.क्र.०३८३५/प्रमोद जाधव, पो.ह.क्र.०४०५६५/प्रकाश भोई, म.पो.ह.०५०५५८/सिमा तिरोडकर, पो.ना.क्र. ०६१९४०/विलास राऊत, पो.शि.क्र.०७१०७४/प्रमोद शिंदे, पो.शि.क्र.०८०५००/लुकमान सय्यद, पो.शि.क्र.०९०४६४/महेश सावंत, पो.शि.क्र.०९०५७२/जितेंद्र पाटील, म.पो.शि.११२१५३/हिना शेख, पो.ह.चा.००६८८/राजाराम कदम, पो.शि.चा.१५०८६३/दिलिपराव राठोड यांनी यशस्वीरित्या पार पाडली.